**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील कार्यालयांमध्ये 'शून्य कचरा व्यवस्थापन' धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद, नागपूर**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)**
**परिपत्रक क्र. जिपना/जिपास्वामि/१०४२/२०२३**
**दिनांक: १० ऑक्टोंबर २०२३**

**<u>प्रस्तावना:</u>**

पाणी, स्वच्छता आणि आरोग्य हया बाबी मानवी जिवनाच्या दृष्टिने महत्वाच्या बाबी असून यावर दुर्लक्ष केल्यास याचे दूरगामी परिणाम मानवी आरोग्यावर होत असल्याचे पहायला मिळतात. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि शहरीकरणामुळे कचरा व्यवस्थापन हे आज देशातील मोठे आव्हान बनले आहे. दिवसेंदिवस कच-याच्या वाढत्या प्रमाणामुळे शासनाने घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार निर्धारीत नियमांना स्थानीक शहरी व ग्रामीण भागांपर्यंत लागू केलेले आहे.

यास अनुसरुन, केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-२ च्या माध्यमातून घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन विकल्पांना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत अश्या तिन्ही स्थानीक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर राबवून कचरा व्यवस्थापनाबाबत शासनाच्या धोरणांना मूर्त स्वरुप देण्याचे आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत सर्व विभागांव्दारे वापरात येणा-या विविध कार्यालयीन उपयोगी वस्तू, साहित्य, उत्पादने, वापरण्याच्या पद्धतींमध्ये रूपांतरण करून, नियोजनबध्दतेने त्याचा वापर आणि उत्पन्न होणा-या कच-याच्या योग्य विल्हेवाटीकरीता रणनिती विकसीत करण्याची भूमिका घेणे अगत्याचे आहे. या भूमिकेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या सर्व कार्यालयांमध्ये शक्य तितक्या वस्तू, साहित्य व उत्पादनांचा कमीत कमी प्रमाणात वापर करणे, सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची वेळोवेळी क्षमता बांधणी करणे आणि वेळोवेळी उत्पन्न होणारा कचरा पुर्नचक्रीकरण व पुर्नवापरासाठी पुरस्कृत करण्याचा मानस आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत पातळीवरील कार्यालयांमध्ये वापरात येणा-या विविध प्रकारच्या वस्तू, साहित्य, उत्पादनांचा योग्य पध्दतीने वापर सुनिश्चित करुन या माध्यमातून उत्पन्न होणारा कचरा उदा. ओला कचरा (अन्न व फळांचे अवशेष) तसेच सुका कचरा- कागद, स्टेशनरी साहित्य, प्लास्टीक कचरा, ई-कचरा इत्यादी पुर्नचक्रीकरणासाठी पुरस्कृत करुन संपूर्ण जिल्हा परिषदेमध्ये **'शून्य कचरा धोरण'** अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

CamScanner

**शून्य कचरा धोरण म्हणजे काय?**

शून्य कचरा धोरणाची अंमलबजावणी म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये वापरात येणा-या विविध प्रकारच्या कार्यालयीन वस्तू, साहित्य, उत्पदनांच्या माध्यमातून निर्माण होणारा कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पुर्नचक्रीकरण करणे म्हणजे त्यांचे मौल्यवान संसाधनांमध्ये रूपांतर करणे जेणेकरून कुठल्याही प्रकारचा कचरा पर्यावरणात पुन्हा जाणार नाही याची दक्षता बाळगणे आहे.

याधोरणाच्या अंमलबजावणीतून कार्यालयीन पातळीवर निम्नलिखीत बाबी करण्यात येणार आहे-

१. जिल्हा परिषदेच्या सर्व पातळीवरील कार्यालयांमध्ये निर्माण होणा-या विविध प्रकारचा ओला, सुका, कागद, प्लास्टीक, ई-कच-याचे विलगीकरण करणे.
२. सर्व कार्यालयीन पातळीवरील प्लास्टीक कच-यालापुर्नचक्रीकरणासाठी पुरस्कृत करणे.
३. सर्व पातळीवरील कार्यालयांमधून निघणा-या कागद साहित्यांचे पुर्नचक्रीकरण करणे.
४. सर्व कार्यालयीन पातळीवर निघणा-या ओला व बागायती कच-याचे कंपोस्ट खतामध्ये रुपांतरण करणे.
५. सर्व कार्यालयीन पातळीवर उपयोगात नसलेल्या ई-कच-याचे ऑडीट करुन पुर्नचक्रीकरण करणे.
६. सर्व कार्यालयीन पातळीवर जुने वापरात नसलेले साहित्यांचा नियमांचे अधिन राहुन लिलाव करणे.

**जबाबदार घटक:**

शून्य कचरा धोरणांची अंमलबजावणी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कार्यालयांची राहणार असून पुर्नचक्रीकरणासाठी जिल्हा परिषद-पंचायत समिती व्दारे निवड केलेल्या संस्थांच्या सांघीक प्रयत्नातून केली जाईल. सर्व विभागांना याबाबत वेळोवेळी शासन प्रचलीत पध्दतीने अवगत केले जाईल.

**'शून्य कचरा धोरण' करीता विभागनिहाय करावयाची कार्यवाही:**

| अ.क्र. | आवश्यक बाबी | कार्यपूर्ती करणारा विभाग |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषदेच्या जुन्या व नवीन इमारतींच्या प्रत्येक माळयावर प्लास्टीक,कागद, ई-कचरा व ओला कच-या करीता चार कचरा कुंडया लावणे. | बांधकामविभाग, जि.प., नागपूर + पंचायत समिती (सर्व) + ग्रामपंचायत (सर्व) |
| २ | जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर शून्य कचरा (Zero Waste) व्यवथापन प्रणाली विकसीत करण्यासाठी कार्यालयीन इमारतींच्या परिसरांमध्ये आपत्तीजनक ठिकाणांची ओळख करणे. अश्या ठिकाणांवर कचरा कुंडयांची उपलब्धता करुन सुशोभिकरण व शक्य असेल तिथे वृक्षारोपण करणे. | बांधकामविभाग, जि.प., नागपूर + पंचायत समिती (सर्व) + ग्रामपंचायत (सर्व) |
| ३ | जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीच्या तळघरामध्ये संकलन केंद्र तयार करणे. सदर ठिकाणावर प्लास्टीक, कागद, ई-कचरा, जुने साहित्य व इतर कचरा विलगीकरणासाठी स्वतंत्र कंपार्टमेंटची व्यवस्था करणे. | बांधकामविभाग, जि.प., नागपूर + पंचायत समिती (सर्व) + ग्रामपंचायत (सर्व) |
| ४ | जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील सर्व विभागांनी त्यांचे उपयोगात नसलेल्या व जुन्या सर्व कार्यालयीन साहित्यांची यादि तयार करुन ते नियमानुसार त्याच्या विल्हेवाटीसाठी कार्यवाही करावी. | जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्व विभाग प्रमुख + बांधकाम विभाग |

CamScanner

| अ.क्र. | आवश्यक बाबी | कार्यपूर्ती करणारा विभाग |
|---|---|---|
| ५ | जिल्हा परिषदेच्या तळघरातील संकलन केंद्रात जमा असलेला प्लास्टीक व पेपर कच-याच्या पुर्नचक्रीकरणासाठी विहीत नियम व कार्यपध्दतींचा अवलंब करुन संस्थेची निवड करणे. | बांधकामविभाग, जि.प., नागपूर + पंचायत समिती (सर्व) + ग्रामपंचायत (सर्व) |
| ६ | जिल्हा परिषदेच्या ई-कच-याच्या पुर्नचक्रीकरणासाठी विहीत नियम व कार्यपध्दतींचा अवलंब करुन संस्थेची निवड करणे. | बांधकामविभाग, जि.प., नागपूर+ पंचायत समिती (सर्व) + ग्रामपंचायत (सर्व) |
| ७ | जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीच्या परिसरात तयार करण्यात आलेल्या नॅडेप खत प्रकल्पामध्ये ओला कच-याचे खतामध्ये रुपांतरण करणे. | कृषि विभाग, जि.प. नागपूर |
| ८ | जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या जुन्या व उपयोगात नसलेल्या वाहनांचे ऑडीट करणे व त्यानुसार पुढील कार्यवाही करणे. | सर्व विभाग प्रमुख, जि.प. यांत्रीकी विभाग + पंचायत समिती (सर्व) |
| ९ | जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्ये अश्या प्रकारच्या सर्व जुने साहित्य लिलाव करण्यासाठी लिलाव कमिटी स्थापन करणे. | मा. अति. मु.का.अ कार्यालय मार्फत प्रक्रिया सुरु करावी |
| १० | जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयांमधील उपलब्ध असलेल्या सर्व शौचालयांची तपासणी करणे. विशेष करुन महिलांकरीता असलेली शौचालय तपासण्यात यावी आणी अश्या सर्व शौचालयांमध्ये सॅनीटरी पॅड वेडिंग मशीन व इंसीनरेटर मशीन बसविणे. तसेच या करीता संबंधीत कंपनीची/पुरवठाधारकाची ३ वर्ष कालावधीसाठी सर्व प्रकारच्या देखभाल दुरुस्तीसह निवड करुन एम्पॅनलमेंट करणे. | बांधकाम विभाग, जि.प., नागपूर + पंचायत समिती (सर्व) |
| ११ | जिल्हा परिषदेच्या नवीन व जुन्या इमारतींमध्ये, पंचायत समिती कार्यालयांमध्ये उभारलेल्या RO प्लांट (Water Purifier) ची तसेच जवळपासच्या परिसराची दर महिन्याला सफाई करुन प्रत्येक महिन्यात पिण्याचे पाण्याची गुणवत्ता तपासावी. | आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| १२ | सर्व विभागांमध्ये दैनंदिन/मासीक स्वरुपात निघणा-या तसेच निंदणीकरण व र्निलेखन करुन निघालेल्या सर्व गोपनीय दस्ताऐवजांच्या विल्हेवाटीसाठी पेपर श्रेडर मशीन उपलब्ध करुन घेणे. | बांधकाम विभाग, जि.प., नागपूर + पं. स. (सर्व) |
| १३ | जिल्हा परिषद व पंचायत समिती परिसर, कार्यालयांमध्ये 'थुंकण्यास बंदी' (No Spit Policy) या धोरणाची सर्व विभागांमार्फत अंमलबजावणी करणे. कार्यालयींन इमारतींमध्ये थुंकण्याच्या ठिकाणांची स्वच्छता करुन सुशोभीकरण व वृक्ष लावणे. | सामान्य प्रशासन विभाग + सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| १४ | प्लास्टीकचा वापर कमीत कमी करण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये वेळोवेळी आयोजीत होत असलेल्या विविध कार्यशाळा, प्रशिक्षण, बैठका ई. मध्ये प्लास्टीक बॉटल्स ऐवजी वॉटर डिसपेंसर (Water Can) व कागदी ग्लास वापरणे. | सर्व विभाग, सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |

CamScanner

| अ.क्र. | आवश्यक बाबी | कार्यपूर्ती करणारा विभाग |
|---|---|---|
| १५ | सर्व विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेतील/पं.स मधील कार्यरत सफाई कर्मचारी यांच्या वेळोवेळी क्षमता बांधणी करण्यासाठी कार्यशाळा/प्रशिक्षणाचे आयोजन करणे. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) स्तरावरील |
| १६ | शून्य कचरा कार्यालय तयार करण्यासाठी विभागनिहाय एक नोडल अधिकारी याची नेमणूक करावी. तसेच कार्यालयात प्रत्येक महिन्यात आपल्या कार्यालयात 'स्वच्छता शपथ' नियमीत स्वरुपात घ्यावी. | सर्व विभाग प्रमुख, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| १७ | प्रत्येक विभागाने माहिन्याच्या तिस-या (३ रा) शनिवारी एक तास स्वच्छतेसाठी श्रमदान करुन जिल्हा परिषदेच्या परिसरात व अंतर्गत कार्यालयीन स्वच्छता करणे. तसेच प्रत्येक महिन्यात प्रत्येक विभागांनी परिसर स्वच्छतेसाठी श्रमदान कार्यक्रमाची जबाबदारी घेणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| १८ | जिल्हा परिषद, पंचायत समिती मधील सर्व विभागांमध्ये अंतर्गत कार्यालयीन सुशोभीकरणासाठी शोभेची झाडे/वृक्ष लावणे. | सर्व विभाग जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| १९ | प्रत्येक तिन महिन्यातून कार्यालयास उपयोगी येत नसलेल्या साहित्यांचे नियमावलीनुसार निलेखन करणे. तसेच, सर्व विभागांनी शासन निर्धारीत नियमांचे अधिन राहुन जुन्या दस्ताऐवजांचे निंदणीकरण करुन निलेखन करणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| २० | सर्व विभागांनी कचरा व्यवस्थापन फिडबॅक प्रणाली विकसीत करणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| २१ | जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व विभागांनी त्यांच्या विभागासमोर शून्य कचरा (Zero Waste) संदर्भाने बॅनर, पोस्टर लावणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व). |
| २२ | सर्व अधिकारी व कर्मचारी शून्य कचरा (Zero Waste) अंतर्गत पेपर व प्लास्टीक कचरा व्यवस्थापनाबाबत जि.प. व पं.स मध्ये कामानिमीत्त येणा-या अभ्यागतांना या प्रणालीचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |
| २३ | सर्व कार्यालयीन विभागांनी प्रत्येक महिन्यात स्वच्छतेप्रती केलेल्या कामाचा अहवाल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांना सादर करणे. उत्कृष्ठ काम करणा-या विभागांचा वेळोवेळी गौरव करणे. | सर्व विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सर्व) |

(सौम्या शर्मा, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

CamScanner